जा.क्र.उमा-१/कोवि/अनु.संच मान्यता/२०/15687
शिक्षण उपसंचालक कार्यालय, कोल्हापूर
दिनांक :- 5 NOV 2020

प्रति,
प्राचार्य/मुख्याध्यापक,
कोल्हापूर विभागातील सर्व शासनमान्य अनुदानित , अनुदानित सलग्न विनाअनुदानित व स्वयंअर्थसहय्यित , उच्च माध्य. शाळा/कनिष्ठ महाविद्यालये.( **स्वतंत्र विनाअनुदानित व स्वयंअर्थसहय्यित कनिष्ठ महाविदयालये वगळून)**

विषय :-१. अनुदानित कनिष्ठ महाविदयालयाच्या संच मान्यता २०१९-२० शिबीराचे आयोजना बाबत.
२.सन २०१८-१९ च्या फक्त अनुदानित शिक्षकेतर कर्मचारी सुधारित पुरवणी संचमान्यता करणेबाबत

संदर्भ १.शिक्षण संचालनालयाचे पत्र क्रमांक:शिक्षक शिक्षकेतर टी-२/संचमान्यता/२०२०/२१३५ दिनांक ३०.९.२०२०

उपरोक्त विषयान्वये आपण दरवर्षी कनिष्ठ महाविदयालयांच्या संचमान्यता करणेबाबतच्या सूचना विचारात घेऊन ऑनलाईन पध्दतीने संचमान्यता करत असतो

.त्याप्रमाणेच सन २०१९-२० मधील अनुदानित (अनुदानित सलग्न विनाअनुदानित तुकडया व स्वयंअर्थसहय्यित तुकडयाअसलेली कनिष्ठ महाविद्यालये ) कनिष्ठ महाविदयालयांच्या नियमित संचमान्यता व सन २०१८-१९ च्या अनुदानित शिक्षकेतर कर्मचारी पुरवणी संचमान्यता अशा दोन्ही संचमान्यता करावयाच्या आहेत.

सन २०१८-१९ च्या शिक्षकेतर कर्मचारी संचमान्यता या फक्त अनुदानित माध्यमिक सलग्न कनिष्ठ महाविदयालयांच्याच करावयाच्या आहेत. त्यामुळे वरीष्ठ महाविदयालय सलग्न कनिष्ठ महाविदयालयांनी शिक्षकेतर कर्मचारी संचमान्यता केल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

यासाठी दरवर्षीच्या संचमान्यता करणेबाबतच्या सूचना विचारात घेऊन या स्तरावर ऑनलाईन पध्दतीने संचमान्यता कार्यालयाच्या www.dydekop.org या संकेतस्थळावर भरुन त्याची एक/एक संगणकीय प्रत आयोजित केलेल्या शिबीरामध्ये सादर करावी. आपण भरलेली माहिती तपासून आपल्या कनिष्ठ महाविद्यालयाची संच मान्यता निश्चित करण्यासाठी खालील कालावधीत व नमूद केलेल्या ठिकाणी शिबिरामध्ये उपस्थित रहावे.

नियोजनानुसार सदर दिवशी आपल्या कनिष्ठ महाविद्यालयातील मुख्याध्यापक/उपप्राचार्य व संच मान्यतेचे काम करणारे लिपिक यांना वेळेत उपस्थित ठेवावे. संच मान्यतेसाठी येताना खालील कागदपत्र आणणे आवश्यक आहे.

१) १०० टक्के अनुदानित तुकडया मंजुरी आदेशाच्या छायांकित प्रती.
२) सन २०१९-२० ची शालार्थला भरलेली विदयार्थीसंखेची ऑनलाईन प्रिंट .
३) सन २०१३-१४ च्या संच मान्यतेची संगणकीय प्रत. (प्राचार्य/मुख्याध्यापक पदांचा स्वाक्षरीसह)
४) बोर्डाने मान्यता दिलेल्या विषय मान्यता पत्राची छायांकित प्रत.
५) सध्या कार्यरत असलेले प्राचार्य/मुख्याध्यापक मान्यतेची छायांकित प्रत.
६) सन २०१८-१९ ची संचमान्यता व त्यानंतर आतापर्यंतच्या बदलाबाबतची योग्य ती कागदपत्रे.
७) पूर्वी नियुक्त केलेल्या अर्धवेळ शिक्षकांचे सेवासातत्य/घ.तासावरील वैयक्तिक मान्यता करणेसाठी या कार्यालयाच्या वेबसाईटवरील चेकलिष्टप्रमाणे कागदपत्रांचे प्रस्ताव तयार करुन सदरच्या शिबिरातच सादर करावेत.

८) पूर्णवेळ शिक्षणसेवक/ शिक्षक तसेच नवीन अर्धवेळ शिक्षणसेवक / शिक्षक नियुक्तीचे प्रस्ताव या शिबिरामध्ये सादर करु नयेत.

९) संचमान्यता माहिती भरत असताना दरवर्षीच्या सूचना विचारात घेऊन नियमानुसार व कार्यभारानुसार शिक्षकांच्या नियुक्त्या दयाव्यात.

१०) सन २०१९-२० ची नवीन भरलेली संचमान्यता प्रत. व सन २०१८-१९ ची संचमान्यता प्रत

११) पटपडताळणी तक्ता सन २०१९-२०. व २०१८-१९.

वरील सुचनांप्रमाणे आवश्यक ती कागदपत्रे सादर करुन आपल्या कनिष्ठ महाविद्यालयाची सन २०१८-१९ ची शिक्षकेतर व सन २०१९-२० ची नियमित संचमान्यता करुन घ्यावी. संचमान्यता करुन न घेतल्यास आपणावर नियमानुसार कारवाई करण्यात येईल तसेच त्या अनुषंगिक उद्भवणाऱ्या परिस्थितीस आपणास सर्वस्वी जबाबदार धरणेत येईल याची नोंद घ्यावी.

| अ.क्र. | जिल्हा | तारीख | वेळ | समाविष्ठ तालुके | संचमान्यतेचे ठिकाण |
|---|---|---|---|---|---|
| १ | सिंधुदूर्ग | १७.११.२०२० | कार्यालयीन वेळेत | सर्व तालुके | मेन राजाराम हाय. व ज्यनिअर कॉलेज भवानी मंडप कोल्हापूर |
| २ | रत्नागिरी | १८.११.२०२० | कार्यालयीन वेळेत | सर्व तालुके | |
| ३ | सातारा | १९.११.२०२० | कार्यालयीन वेळेत | कराड, पाटण, खटाव, माण, कोरेगाव,फलटण | |
| | | २०.११.२०२० | कार्यालयीन वेळेत | सातारा ,वाई, जावली, महाबळेश्वर, खंडाळा | |
| ४ | सांगली | २३.११.२०२० | कार्यालयीन वेळेत | वाळवा, शिराळा, क.महंकाळ ,जत, आटपाडी, तासगाव | |
| | | २४.११.२०२० | कार्यालयीन वेळेत | सांगली शहर, मिरज, पलूस, खानापूर, कडेगाव | |
| ५ | कोल्हापूर | २५.११.२०२० | कार्यालयीन वेळेत | हातकणंगले, शिरोळ,कागल,गगनबावडा,राधानगरी | |
| | | २६.११.२०२० | कार्यालयीन वेळेत | कोल्हापूरशहर,शाहूवाडी,चंदगड ,आजरा,गडहिंग्लज,पन्हाळा,भुदरगड,करवीर | |

(सत्यवान सोनवणे)
शिक्षण उपसंचालक
कोल्हापूर विभाग, कोल्हापूर

प्रत- माहिती व कार्यवाहीसाठी
शिक्षणाधिकारी (माध्य) जि.प.सर्व कोल्हापूर विभाग
संबंधितांना आपले स्तरावरुन अवगत करावे